# जिल्हा परिषद , शिक्षण विभाग ,नाशिक

E mail ID :- mdmnashik@gmail.com

---

वाचा :- १) मा.ॲडीशनल सेशन जज संगमनेर जिल्हा अहमदनगर यांचे कडील निकालपत्र दिनांक २९/४/२०१६

२) अति.जिल्हा सरकारी अभियोक्ता,सेशन कोर्ट संगमनेर जि.अहमदनगर यांचे कडील पत्र दि.६/९/१६

३) या कार्यालयाचे आदेश क्रमांक /शिक्षण/प्राथ-९/५५७/२०१७ दिनांक १/८/२०१७

४) मा.मु.का.अ.जि.प.नाशिक यांचे दालनात सुनावणी दिनांक १८/१२/२०१७

५) कार्यालयीन मंजुर टिपणी दिनांक / १२/२०१७

---

शिक्षणाधिकारी (प्राथ) जि.प.नाशिक
जा.क्र./शिक्षण/प्राथ-९/५७/२०१७
दिनांक २०/१२/२०१७

आदेश

श्री.मच्छिंद्र बुधा खाडे प्रा.शि.हे जिल्हा परिषद शाळा मांजरगाव ता.ईगतपूरी येथे कार्यरत असतांना त्यांचे विरुध्द राजुर पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा रजिष्टर मध्ये गुन्हा रजिष्टर नंबर १४/०९ भारतीय दंड विधान संहिता कलम ३७६ प्रमाणे दिनांक २८/५/२००९ रोजी अटक झाल्याने दिनांक २८/५/२००९ रोजी पासुन जिल्हा परिषद सेवेतुन निलंबित करणेत आले होते.

श्री.मच्छिंद्र बुधा खाडे प्रा.शि.यांना ज्या गुन्हयामध्ये जि.प.सेवेतुन निलंबीत करणेत आले होते. त्या गुन्हयातुन मा.ॲडीशनल सेशन जज संगमनेर न्यायालयाने त्यांना निर्दोष मुक्त केले आहे.त्यानुसार संदर्भ क्र.३ नुसार श्री.मच्छिंद्र बुधा खाडे प्रा.शि.यांचे निलंबन रद्द करुन त्यांना जिल्हा परिषद शाळा न्यायडोंगरी ता.नांदगाव येथे पुर्नस्थापित करणेत आलेले आहे.

श्री.खाडे प्रा.शि.यांचे प्रकरण मा.ॲडीशनल सेशन जज संगमनेर जिल्हा अहमदनगर यांचे न्यायालयात दिनांक २८/५/२००९ ते २८/४/२०१६ या कालावधीत प्रलंबीत होते.सदर कालावधी हा महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी,स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन/बडतर्फे व सेवेतुन काढुन टाकणे या काळातील प्रदाने) नियम १९८१ चा नियम ७२ (५) अन्वये निलंबन कालावधी हा सर्वप्रयोजनार्थ निलंबन कालावधी धरण्यात येत आहे.तसेच मा.ॲडीशनल सेशन जज संगमनेर जिल्हा अहमदनगर यांचे न्यायालयाचे निर्णय दिनांक २९/४/२०१६ नुसार श्री.खाडे प्रा.शि.यांना निर्दोष मुक्त केलेले असल्याने सदर निकालाच्या दिनांक २९/४/२०१६ ते पुर्नस्थापित केल्याचा दिनांक पावेतोचा काळ म.ना.से १९८१ चे कलम ७२ (४) नुसार निलंबन काळ सर्व प्रयोजनार्थ सेवाकाळ धरण्यात येत आहे.

सदर आदेशाची नोंद श्री.मच्छिंद्र बुधा खाडे प्राथमिक शिक्षक यांचे मुळसेवापुस्तकात घेण्यात यावी.

२०/१२

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद नाशिक

प्रति ,

श्री.मच्छिंद्र बुधा खाडे प्रा.शि.जिल्हा परिषद शाळा न्यायडोंगरी ता.नाशिक

प्रत :-गट विकास अधिकारी (उ.श्रे.) पंचायत समिती नांदगाव/सुरगाणा/ईगतपूरी यांचे माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाही साठी रवाना

प्रत :- गट शिक्षण अधिकारी पंचायत समिती नांदगाव/सुरगाणा/ईगतपूरी यांचे माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाही साठी रवाना

Scanned by CamScanner

वाचा :- १) गट शिक्षण अधिकारी पंचायत समिती दिंडोरी यांचे कडील पत्र क्रमांक पसदि /शिक्षण/आ-३/७२०/२०१५ दिनांक २४/६/२०१५

२) मा.मु.का.अ.जि.प.नासिक यांचे कडील ज्ञापन क्र. शि/प्राथ-९/१०७८/२०१५ दि.५/११/२०१५

३) मा.मु.का.अ.जि.प.नासिक यांचे कडील आदेश क्र.शिक्षण/प्रा-९/८६/२०१६ दि.१०/३/२०१६

४) सहाय्यक आयुक्त (चौकशी) नाशिक विभाग नाशिक यांचे कडील अहवाल क्र.विशा ४/खाचौ/ सीआर ७९/२०१६ दिनांक ३१/१/२०१७.

५) या कार्यालयाची अंतिम कारणे दाखवा नोटीस क्रमांक शिक्षण/प्राथ-९/६०६/२०१७ दि.१६/८/२०१७

६) मा.मु का अ यांचे दालनात सुनावणी दिनांक १८/१२/२०१७

७) कार्यालयीन मंजुर टिपणी दिनांक :- / /२०१७.

---

आदेश

शिक्षण विभाग (प्राथ) जि.प.नाशिक
जा.क्र./शिक्षण/प्राथ-९/८७१/२०१७
दिनांक २९/१२/२०१७.

ज्याअर्थी श्री.मुरलीधर बन्सु गवळी प्राथ.शिक्षक जिल्हा परिषद शाळा वांजुळपाडा ता.दिंडोरी येथे काम करीत असतांना शासकीय कामकाजात अडथळा करणे,कर्तव्यात कसुरी करणे,यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नूकसान केलेले आहे. सहकारी शिक्षिका श्रीम.सविता मोठाभाऊ कापडणीस उपशिक्षिका यांच्या नावाने स्त्री स्वभावाला लज्जा उत्पन्न होईल अशा प्रकारे शाब्दीक शेरे बाजी करणे.वेळोवेळी भ्रमणध्वनीव्दारे संपर्क करुन खाजगी व वैयक्तिक माहिती विचारात असे याव्दारे याव्दारे कर्तव्यात कसूर केल्याने संदर्भ क्र.१ गट शिक्षण अधिकारी पंचायत समिती दिंडोरी यांचे कडील पत्र क्रमांक पसदि/आस्था-३/७२०/२०१५ दि.२४/६/२०१५ अन्वये श्री.मुरलीधर बन्सु गवळी प्राथ.शिक्षक यांचे विरुध्द खाते निहाय चौकशी करणे कामी दोषारोप पत्र क्र.१ ते ४ सादर करण्यात आले होते.

ज्याअर्थी श्री.मुरलीधर बन्सु गवळी प्राथ.शिक्षक यांना संदर्भ क्र. २ मा.मु.का.अ.जि.प.नासिक यांचे कडील ज्ञापन क्र. शि/प्राथ-९/१०७८/२०१५ दि.५/११/२०१५ अन्वये यांचे ज्ञापन व परिशिष्ट दोषारोप पत्र क्रमांक १ ते ४ बजाविण्यात आले असून सदर ज्ञापन व परिशिष्ट दोषारोप पत्र क्रमांक १ ते ४ ला श्री.मुरलीधर बन्सु गवळी प्राथ.शिक्षक यांनी खुलासा असमाधानक कारक सादर केलेला आहे.

ज्याअर्थी श्री.मुरलीधर बन्सु गवळी प्राथ.शिक्षक यांनी ज्ञापन व परिशिष्ट दोषारोप पत्र क्रमांक १ ते ४ ला दिलेला खुलासा असमाधान कारक असल्याने संदर्भ क्रमांक ३ अन्वये मा.मु.का.अ.जि.प.नासिक यांचे कडील आदेश क्र.शिक्षण/प्रा-९/८६/२०१६ दि.१०/३/२०१६ अन्वये सहाय्यक आयुक्त चौकशी यांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली होती

ज्याअर्थी सहाय्यक आयुक्त चौकशी तथा चौकशी अधिकारी यांनी श्री.मुरलीधर बन्सु गवळी प्राथ.शिक्षक यांचे विरुध्दात असलेले आरोपाबाबत सविस्तर चौकशी करुन मा.सहाय्यक आयुक्त (चौकशी) यांनी संदर्भ क्र.४ अन्वये क्र.विशा ४/खाचौ/सीआर ७९/२०१६ दिनांक २७/४/२०१६ रोजीच्या पत्रान्वये सादर केलेला आहे. उक्त चौकशी अहवालावरुन श्री.मुरलीधर बन्सु गवळी प्राथ.शिक्षक यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ चे नियम ३ चा भंग केला आहे, असा निष्कर्ष काढल्याने श्री.मुरलीधर बन्सु गवळी प्राथ.शिक्षक यांना महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम १९६४ चे नियम ४ (७) नुसार श्री.मुरलीधर बन्सु गवळी प्राथ.शिक्षक जिल्हा परिषद सेवेतून बडतर्फे का करण्यात येवू नये ? याबाबत संदर्भ क्र.५ अन्वये अंतिम कारणे दाखवा नोटीस क्रमांक शिक्षण/प्राथ-९/६०६/२०१७ दि.१६/८/२०१७ अन्वये देण्यांत येवुन त्याबाबतचा खुलासा २१ दिवसांच्या आंत सादर करणेबाबत कळविण्यात आलेले होते.

ज्याअर्थी प्रस्तुत अंतिम कारणे दाखवा नोटीस पत्रास श्री.मुरलीधर बन्सु गवळी प्राथ.शिक्षक यांनी दिनांक ८/११/२०१७ रोजी खुलासा सादर केलेला आहे. श्रीम.बोरसे प्रा.शि. यांनी खुलासा सादर केलेला नसल्याने त्यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ चे नियम ३ चा भंग केलेचे सिध्द होते.

ज्याअर्थी श्री.मुरलीधर बन्सु गवळी प्राथ.शिक्षक यांची दिनांक १८/१२/२०१७ रोजी मा.मु.का.अ.यांचे दालनात सुनावणी घेण्यात आली सदर सुनावणी मध्ये श्री.मुरलीधर बन्सु गवळी प्राथ.शिक्षक यांनी सुनावणी मध्ये बचावात्मकबाजु मांडलेली आहे.

त्याअर्थी श्री.मुरलीधर बन्सु गवळी प्राथ.शिक्षक यांना त्यांचे विरुध्द खातेचौकशी प्रकरणी शासन होणे बाबत नियुक्ती प्राधिकारी या नात्याने माझे मत झाल्याने मी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नाशिक मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये श्री.गवळी प्रा.शि.यांचे विरुध्द महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम १९६४ चे नियम ४ (२) नुसार श्री.दोन वेतनवाढी पुढील वेतनवाढीवर परिणाम होणार नाही अशारितीने तातुपरत्या स्वरुपात बंद करण्यात येत आहे.

सदर आदेशाची नोंद श्री.मुरलीधर बन्सु गवळी प्राथ.शिक्षक यांचे मुळसेवापुस्तकात घेण्यात यावी.

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद नाशिक

**प्रत-** श्री.मुरलीधर बन्सु गवळी प्राथ.शिक्षक जिल्हा परिषद शाळा वांजुळपाडा ता.दिंडोरी

**प्रतः-** गटशिक्षण अधिकारी पंचायत समिती, दिंडोरी/सुरगाणा

Scanned by CamScanner